**आयकरातील कर कपात..**

- CA ओंकार कुलकर्णी.

भारतासारख्या महाकाय देशात कर संकलन ही एक अत्यंत सुव्यवस्थितपणे पार पाडावी लागणारी अवघड गोष्ट आहे. आपल्याकडे सरकार दोन प्रकारचे कर गोळा करते - एक प्रत्यक्ष कर आणि दुसरा अप्रत्यक्ष कर. आज देशात प्रत्यक्ष कर (Direct Tax) हा आयकराच्या स्वरुपात आपल्याकडून घेतला जातो तर अप्रत्यक्ष कर (Indirect Tax) हा प्रामुख्याने GST च्या स्वरुपात आपल्याकडून घेतला जातो.

एखाद्या वर्षाचा आयकर हा खरं तर ते आर्थिक वर्ष (Financial Year) संपल्यावर त्याच्या निर्धारण वर्षात (Assessment Year) आयकर विवरणपत्र (Income Tax Return) भरताना भरला जाऊ शकतो. पण सर्वांनी तसे केल्यास देश चालवण्यासाठी सरकारला आगाऊ पद्धतीने पैसे मिळणार नाहीत. म्हणूनच आयकर विभागाने आपल्याकडून आगाऊ पद्धतीने कर गोळा करण्यासाठी आगाऊ कर (Advance Tax), TDS आणि TCS यांच्या तरतुदी लागू केल्या आहेत. त्यापैकी TDS या विषयावर आजच्या लेखात सविस्तर चर्चा करुयात.

आपल्याला मिळणाऱ्या विविध प्रकारच्या उत्पन्नांच्या स्त्रोतापाशीच त्या उत्पन्नातील आयकर TDS च्या स्वरुपात आपल्याला ते उत्पन्न देणारी व्यक्ती कपात करून घेते आणि ती रक्कम थेट सरकारजमा करते. यात सुरुवातीला नेमके कोणी हा TDS कपात करून भरायचा आहे ते पाहुयात:-

**१. वैयक्तिक करदाते (Individual Taxpayer) किंवा हिंदु अविभाज्य कुटुंब (Hindu Undivided Family - HUF)** - वैयक्तिक करदाते किंवा HUF करदात्यांच्या बाबतीत त्यांना मागील आर्थिक वर्षात आयकर कायद्यातील कलम 44AB खाली ऑडिट (Tax Audit) लागू असल्यास चालू वर्षात TDS कपातीचे नियम लागू होतात. त्यांनी आपल्या व्यवसायातून केल्या जाणाऱ्या खर्चांच्या बाबतीतील ज्या त्या कलमाच्या मर्यादा पाहून योग्य टक्केवारीने कर कपात करून मगच खर्चाची रक्कम पुढील व्यक्तिच्या हातात ठेवायची आहे. येथे एक अपवाद आहे - जर एखादा वैयक्तिक करदाता किंवा HUF करदाता भाडे देत असेल आणि त्याची रक्कम दर महा रु. ५०,०००/- पेक्षा जास्त असेल तर अशा सर्व वैयक्तिक किंवा HUF करदात्यांनी, मागील आर्थिक वर्षात Tax Audit लागू नसले तरीही, ५% TDS कपात करून भाड्याची रक्कम द्यायची आहे.

**२. भागीदारी फर्म (Partnership Firm), LLP, Private Limited किंवा Public Limited Company -** या प्रकारच्या सर्व करदात्यांना अगदी त्यांच्या सुरुवातीपासूनच (Incorporation पासून) TDS कपातीचे नियम लागू होतात. त्यांनी पहिल्या दिवसापासून सर्व खर्चांच्या बाबतीत TDS चे नियम पाळणे गरजेचे आहे.

हा कपात केलेला TDS ज्या महिन्यात कपात केली आहे (मार्च महिना सोडून) त्याच्या पुढील महिन्याच्या ७ तारखे पर्यंत सरकार खाती जमा करायचा आहे. केवळ मार्च महिन्यासाठी भरणा करण्याची तारीख ३० एप्रिल आहे. वरील वेळेत TDS चा भरणा न केल्यास कपात केलेल्या महिन्यापासून TDS च्या रकमेवर दर महीना १.५% एवढे व्याज भरावे लागते.

आता आपल्याला व्यवसायातील दैनंदिन व्यवहारात लागू असणाऱ्या विविध कलमांखाली TDS कपातीच्या मर्यादा काय आहेत आणि कपातीची टक्केवारी कशी आहे ते खाली पाहुयात -

| Section | Nature of Payment | Threshold Limit (Rs.) | TDS Rates |
|---|---|---|---|
| 192 | Salaries | Basic exemption limit of employee | Normal Slab Rates |
| 192A | Premature withdrawal from EPF | 50,000 | 10% |
| 193 | Interest on securities | 10,000 | 10% |
| 194 | Dividends | 5,000 | 10% |
| 194A | Interest other than interest from securities (from deposits with banks/post office/co-operative banks) | 40,000 | 10% |
| 194A | Interest other than interest from securities (Any other person) | 5,000 | 10% |
| 194B | Income from lottery winnings, card games, crossword puzzles, and other games of any type | 10,000 | 30% |
| 194BA | Income from online games | Nil | 30% |
| 194BB | Income from horse race winnings | 10,000 | 30% |
| 194C | Payment to contractor/sub-contractor:- | Single transaction- 30,000<br><br>Aggregate transactions- 1,00,000 | |
| | - Individual/HUF | | 1% |
| | - Others | | 2% |
| 194D | Insurance commission:- | | 0% |
| | - Other than Domestic Company | 15,000 | 5% |
| | - Domestic Company | 15,000 | 10% |
| 194DA | Income for the insurance pay-out, while payment of any sum in respect of a life insurance policy. | 1,00,000 | 5% |
| 194EE | Payment of amount standing to the credit of a person under National Savings Scheme (NSS) | 2,500 | 10% |
| 194F | Payment for the repurchase of the unit by Unit Trust of India (UTI) or a Mutual Fund | Nil | 20% |
| 194G | Payments, commission, etc., on the sale of lottery tickets | 15,000 | 5% |
| 194H | Commission/Brokerage | 15,000 | 5% |
| 194I | Rent:- | | |
| 194-I(a) | Rent on plant and machinery | 2,40,000 | 2% |
| 194-I(b) | Rent on land/building/furniture/fitting | 2,40,000 | 2% |
| 194IA | Transfer of certain immovable property other than agriculture land | 50,00,000 | 1% |
| 194IB | Rent payment by an individual or HUF not covered u/s. 194-I | 50,000 per month | 5% |
| 194IC | Payment under Joint Development Agreements to Individual/HUF | Nil | 10% |
| 194J | Professional / Technical Fees | 30,000 | 10% / 2% |
| 194K | Payment of any income for units of a mutual fund, for example, dividend | Nil | 10% |
| 194N | Cash withdrawal exceeding a certain amount | 1 crore | 2% |

| | | | |
|---|---|---|---|
| 194N | Cash withdrawal in case person not filing ITR for last three years and the original ITR filing due date expired | - 20 lakh to 1 crore | 2% |
| | | - Above 1 crore | 5% |
| 194-Q | Payment for purchase of goods of the aggregate value exceeding Rs. 50 lakhs<br>Note: TDS is deductible on sum exceeding Rs. 50 lakhs | 50 lakh | 0.1% |

वरीलप्रमाणे कपात करून भरलेल्या TDS ची माहिती तिमाही विवरण पत्राद्वारे (Quarterly Return) आपल्याला सरकार कडे सादर करावी लागते. प्रत्येक तिमाही संपल्यावर पुढच्या महिन्याच्या अखेरपर्यंत हे विवरणपत्र दाखल करावे. सदर वेळेत हे विवरणपत्र दाखल न केल्यास त्यासाठी प्रतिदिन रु. २००/- एवढी रक्कम विलंब शुल्क म्हणून भरावी लागते.

एखाद्या खर्चाच्या बाबतीत TDS कपात न केल्यास कलम 40(a)(ia) खाली सदर खर्चाच्या ३०% एवढी रक्कम आपल्या उत्पन्नातून वजावट म्हणून अपात्र ठरवली जाते.

TDS च्या संबंधित वर संक्षेपाने चर्चा केलेल्या सर्व नियमांचे पालन करावे. तसेच वेळोवेळी आपल्या चार्टर्ड अकाउंटंट (CA) यांच्याशी सल्लामसलत करून TDS कपात, त्याचा वेळेत भरणा आणि त्याचे विवरण पत्र वेळेत दाखल करावे.